# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक : - ६ डिसेंबर २०२४

---

जळगाव दि.६ (प्रतिनीधी) : महात्मा ज्योतीबा फुले स्मृतीदिन (२८ नोव्हेंबर) ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन (६ डिसेंबर) हे नऊ दिवस संविधानाची जाण नव्या पिढीत निर्माण करण्यासाठी नव्या प्रकारची नवरात्र म्हणून साजरे केली जावी अशी अपेक्षा उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे प्रथम कुलगुरु डॉ.एन.के.ठाकरे यांनी व्यक्त केली.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विचारधारा प्रशाळे अंतर्गत असलेल्या बौध्द अध्ययन व संशोधन केंद्राच्या वतीने शुक्रवार दि. ६ डिसेंबर रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनानिमित्त डॉ.ठाकरे यांचे “संविधान:एक आकलन” या विषयावर व्याख्यान झाले. याप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरु प्रा.व्ही.एल.माहेश्वरी होते. यावेळी विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ.के.बी.पाटील यांच्या हस्ते डॉ.एन.के.ठाकरे यांच्या ‘निंबोळ’या कथा संग्रहाचे प्रकाशन झाले. मंचावर प्र-कुलगुरु प्रा.एस.टी.इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, विचारधारा प्रशाळेचे प्रभारी संचालक प्रा.म.सु.पगारे उपस्थित होते.

डॉ.ठाकरे आपल्या व्याख्यानात म्हणाले की घटनेप्रमाणे देश चालणार नसेल तर राज्य आणि देश पारतंत्र्यात जाईल. कोणतेही राज्यकर्ते चातुर्वण्य व्यवस्था मिटली पाहिजे याबद्दल बोलत नाहीत. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी अत्यंत प्रवाही घटना लिहीली. मात्र त्यावरही काही जण चुकीचे आक्षेप घेत आहेत. प्रत्येक माणसाचा विचार घटनेत झालेला आहे. विषमतेवर मात करुन लोकशाही वाढविणे हे त्यांना अभिप्रेत होते. आपला समाज हा रितीरिवाज, अंधश्रध्दा यामुळे अंध झाला असुन विचार करायला तयार नाही. अशी खंत डॉ.ठाकरे यांनी व्यक्त केली.

डॉ.के.बी. पाटील यांनी या देशातील लोकशाही टिकण्याचे श्रेय राज्य घटनेला दिले पाहिजे असे सांगुन घटनेच्या वर जात – धर्म – पंथ आणून व्यक्तीपूजा केली जात असल्यामुळे भविष्यात तरुण पिढीचे काय होईल व लोकशाही टिकेल की नाही याची भिती वाटते असेही ते म्हणाले.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरु प्रा.माहेश्वरी यांनी तरुणांच्या या देशात आई-वडील, शिक्षक आणि महापुरुष हे आदर्श असणे गरजेचे आहे. त्यातुन देश विकसीत होईल असे मत व्यक्त केले. प्रारंभी प्रा.म.सु.पगारे यांनी प्रास्ताविक केले. भालचंद्र सामुद्रे यांनी अभिवाद गित सादर केले. प्रा.दीपक खरात यांनी कार्यक्रमाचे सुत्रसंचालन केले. डॉ.संतोष खिराडे यांनी आभार मानले.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

डॉ.सुनील पाटील

जनसंपर्क अधिकारी

जळगाव दि.६ (प्रतिनीधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्राच्या वतीने भित्ती पत्रिकेद्वारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना काव्यमय आदरांजली देण्यात आली.

व्यवस्थापन शास्त्र प्रशाळेतील पद्व्युत्तर विभाग प्रमुख डॉ. रमेश सरदार यांच्या हस्ते भित्ती पत्रिकेचे विमोचन करण्यात आले. यावेळी प्रशाळेचे संचालक प्रा. म.सु. पगारे यांच्यासह प्रा. प्रतिभा गलवाडे, प्रा.प्रिती सोनी, भारती सोनवणे, नेत्रा उपाध्ये, कृष्णा संदानशिव, स्नेहा गायकवाड, महेश सुर्यवंशी उपस्थित होते. यावेळी प्रा. कैलास पाटील, सुबोध वाकोडे, विकास वले यांनी गीत, कविता, पोवाडे यांचे वाचन व सादरीकरण केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कृष्णा संदानशीव यांनी केले. तर आभार स्नेहा गायकवाड यांनी मानले.

**बातमी क्र. २**

जळगाव दि.६ (प्रतिनीधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या सामाजिकशास्त्र प्रशाळेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन कार्यक्रम घेण्यात आला.

डॉ. अभय मनसरे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार या विषयावर व्याख्यान दिले. अध्यक्षस्थानी प्रशाळेचे प्रभारी संचालक प्रा. अजय पाटील उपस्थित होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. आंबेडकर विचारधारा विभाग प्रमुख प्रा. राकेश रामटेके उपस्थित होते. डॉ. विजय घोरपडे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन केले. शंकर यशोद यांनी आभार मानले.

.......................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: ६ डिसेंबर, २०२४

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी